सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
E-Mail : prajasattaknews24@gmail.com | RNI No. - MAHMAR 2023/84526 | Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026
वर्ष - ४ थे | अंक - २१३ वा | अमरावती (महाराष्ट्र) | शुक्रवार दि. २ ऑक्टोबर २०२६ | संपादक - डॉ. शुभांगी जोशी | मुल्य - १ रु. | पृष्ठ -४

# समृद्धी महामार्गावर ट्रकने दुर्गामूर्ती घेऊन जाणाऱ्या वाहनाला धडक दिल्याने ७ ठार, २० जखमी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२ अमरावती** धामणगाव रेल्वे तालुक्यातील तळणी गावाजवळ समृद्धी महामार्गावर दुर्गामूर्ती घेऊन जाणाऱ्या टाटा एसला भरधाव ट्रकने मागून जोरदार धडक दिल्याने ७ जण ठार झाले, तर २० जण जखमी झाले, त्यापैकी ५ जणांची प्रकृती चिंताजनक आहे. हा अपघात शनिवारीहा अपघात नागपूर-मुंबई समृद्धी महामार्गावरील चैनेज क्रमांक ९७/३०० जवळपहाटे सुमारे १ वाजता घडला.

पोलिसांच्या माहितीनुसार, टाटा एस (चक-०५-इक-५७९३) शेगावहून दुर्गादेवीची मूर्ती घेऊन वाशिमहून वर्ध्याकडे जात असताना मागून येणाऱ्या ट्रकने (उत्क्ष-०७-उग-८८५५) जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की सात जणांचा जागीच मृत्यू झाला, तर इतर प्रवासी महामार्गावर फेकले गेले.मृतांची ओळख दत्ता कुरसंगे (५५), प्रवीण बकाने (५०), घनश्याम पाटील (६०), गोलू उर्फ सचिन बदलमवार (३८), ओम गवंडे (२२), रोशन राऊत (२६) आणि अन्य एक अशी झाली आहे. सर्व मृत हे वर्ध्यातील सोमनाथ लेआउट, सिंधी मेघे येथील रहिवासी होते.गंभीर जखमींमध्ये दिनेश रामकृष्ण पोहनकर (३५), नरेंद्र प्रल्हाद संयम (४९), मुनेश्वर देवराव ढोले (५३), सागर मुनेश्वर ढोले (२७), सतिश वसंत राऊत (४३), सतिश पांडुरंग खाडे (३५), अनिल मारोतराव मसराम (४७), दिनेश पांडुरंग ननावते (४०), नयन सुधीर खांजोडे, रवी मालकापूरे (३०) आणि अमित अनिल आडे (२५) यांचा समावेश आहे. त्यापैकी पाच जणांची प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगण्यात येत आहे.किरकोळ जखमींमध्ये प्रतिक रामदास शिरसाकर (३१), अनुज अनिल आडे (२३), दुर्गेश यशवंत भिसेन (३०), आर्यन प्रभाकर वैद्य (१९), शुभम शामसुंदर ढबाले (३०) आणि प्रणय प्रभाकर ढोले (३३) यांचा समावेश आहे.अपघातानंतर महामार्गावर एकच गोंधळ उडाला, जखमींच्या किंकाळयांनी रात्र हादरली. जखमींना प्रथम धामणगाव रेल्वे ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आले, त्यानंतर पुढील उपचारासाठी सावंगी (मेघे) आणि सेवाग्राम येथील रुग्णालयात हलवण्यात आले.माहिती मिळताच धामणगाव रेल्वेच्या मुख्याधिकारी अर्चना अडसड-रोडे यांनी ग्रामीण रुग्णालयात धाव घेत जखमींना सावंगी मेघे येथे हलवण्यासाठी रुग्णवाहिकांची व्यवस्था केली.अमरावती परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक डॉ. महेश पाटील, अमरावती पोलीस अधीक्षक निकेतन कदम आणि चांदूर रेल्वेचे उपविभागीय पोलीस अधिकारी गिरीश ताथोड यांनी रात्रीच घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. दत्तापूरचे पोलीस निरीक्षक गजानन मेहत्रे आणि मंगरूळ दस्तगीरचे पोलीस निरीक्षक अत्राम हे देखील घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.जिल्हा प्रशासन आणि पोलिसांनी तात्काळ मदत पुरवली असून सर्व जखमींना सावंगी आणि सेवाग्राम येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे, असे अधिकाऱ्यांनी सांगितलेया दुर्गा मंडळाचे हे ८ वे वर्ष आहे. गत ५ वर्षांपासून ही मंडळी समृद्धी मार्गानेच मूर्ती घेऊन येत असतात. मूर्ती सोबत असल्याने डोळ्यात तेल घालून व दक्ष राहून प्रवास केल्या जातो.

यावेळी १४ फूट उंचीची दुर्गामाता मूर्ती सोबत होती. सर्व ती काळजी घेऊन कंटाळवाना म्हणता येईल असा हा प्रवास भक्तिमय भावनेत सूरू. पण काळ गावाजवळ येऊन वाट बघत आहे, अशी सूतराम शंका कोणास आली नाही. सर्व २० ते २५ या वयोगटातील व विविध व्यवसाय करणारे. या मंडळाचा उत्सव भव्य मूर्ती व विविध उपक्रम असल्याने शहरात लोकप्रिय म्हटल्या जातो.




### मुख्यमंत्र्यांकडून शोक व्यक्त

अमरावती जिल्ह्यात काल मध्यरात्री झालेल्या भीषण अपघातात ७ जणांचा मृत्यू झाल्याची घटना अतिशय दुर्दैवी आहे. हे सर्व वर्धा जिल्ह्यातील रहिवासी आहेत. मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत. अमरावती पोलिस अधीक्षक आणि अन्य अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेत तातडीने मदत दिली. जखमींना सावंगी आणि सेवाग्राम येथील वैद्यकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार केले जात आहेत. २० जखमींपैकी ५ जणांची प्रकृती गंभीर आहे. त्यांच्या प्रकृतीत लवकर सुधारणा व्हावी, अशी मी ईश्वरचरणी प्रार्थना करतो.

# सणासुदीच्या तोंडावर डाळ स्वस्त होणार

## केंद्र सरकार मोठा निर्णय घेण्याच्या तयारीत

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२मुंबई-** ३देशात वाढत्या महागाईने सर्वसामान्य नागरिकांच्या घरखर्चाचे गणित बिघडवले आहे. रोजच्या स्वयंपाकातील महत्त्वाचा घटक असलेल्या साखरेनंतर डाळींच्या दरांमध्येही सातत्याने वाढ होत आहे. आगामी सणासुदीच्या पार्श्वभूमीवर ही दरवाढ आणखी तीव्र होण्याची शक्यता असल्याने केंद्र सरकारकडून डाळींच्या आयातीवरील शुल्क कमी करण्याचा विचार सुरू असल्याची माहिती समोर आली आहे. या निर्णयामुळे डाळ स्वस्त होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मात्र, याबाबत सरकारकडून अद्याप कोणतीही अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही.




मिळालेल्या माहितीनुसार, देशातील डाळींचा पुरवठा वाढवण्यासाठी आणि वाढत्या किमतींवर नियंत्रण ठेवण्यासाठी काही डाळींवरील आयात शुल्कात कपात केली जाऊ शकते. विशेषतः चना आणि मटर यांचा यात समावेश होण्याची शक्यता आहे. सध्या चणा आणि मसूरच्या आयातीवर १० टक्के, तर मटरवर ३० टक्के आयात शुल्क आहे. दुसरीकडे, तूर आणि उडीद डाळीच्या आयातीवर ३१ मार्च २०२७ पर्यंत कोणतेही शुल्क आकारण्यात येणार नाही.

दरम्यान, महाराष्ट्रातील दुष्काळ तसेच मान्सूनचे यंदाचे प्रमाण लक्षात घेऊन सरकारने हा निर्णय घेतल्याचे म्हटले जात आहे. देशातील डाळींच्या उत्पादनाचा मोठा हिस्सा पावसावर अवलंबून आहे. जून ते सप्टेंबर या कालावधीत प्रमुख डाळ उत्पादक भागांमध्ये कमी पावसामुळे उत्पादनावर परिणाम होण्याची चिंता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे आगामी काळात बाजारातील पुरवठा आणि किमती यावर दबाव निर्माण होऊ शकतो.

सणासुदीच्या काळात डाळींची मागणी नेहमीच वाढते. घरगुती वापराबरोबरच व्यापारी आणि खाद्यप्रक्रिया कंपन्यांकडूनही मोठ्या प्रमाणात साठवणूक केली जाते. त्यामुळे मागणी वाढली आणि देशांतर्गत उत्पादन घटले, तर दर आणखी वाढण्याची शक्यता आहे. दरम्यान, अलीकडच्या काळात चणा, मूग, मटर आणि तूर यांच्या बाजारभावात वाढ झाल्याचे वृत्त आहे. त्यामुळे आयात शुल्कात कपात केल्यास परदेशातून डाळींचा पुरवठा वाढवून देशांतर्गत बाजारातील उपलब्धता सुधारण्याचा सरकारचा प्रयत्न आहे.

# शिंदेंसेनेच्या बड्या नेत्यासह ७ जणांवर गुन्हा

## नामांकित हॉस्पिटलच्या संचालकाकडे १२ लाखांची मागितली खंडणी

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२नागपूर-** डोंबिवलीच्या रुग्णालयातील डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांना नगरसेवक रमेश म्हात्रे यांनी मारहाण केली. हे प्रकरण ताजे असतानाच आता नागपूरमधून धक्कादायक घटना समोर आली आहे. नागपूरमधील एका नामंकित हॉस्पिटलमध्ये रुग्णाच्या उपचारादरम्यान झालेल्या मृत्यूनंतर हॉस्पिटल संचालकाकडे तब्बल १२ लाख रुपयांची खंडणी मागितल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी शिंदे गटाच्या शिवसेनेच्या ७ पदाधिकाऱ्यांविरोधात नागपूरच्या पाचपावली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणामुळे नागपूरच्या राजकीय आणि वैद्यकीय क्षेत्रात खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, वर्धा येथील विठ्ठल साठे यांना ३० ऑगस्ट रोजी उपचारासाठी नागपुरातील खासगी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते. रुग्णाला गंभीर स्वरूपाचा संसर्ग झाल्याचे डॉक्टरांनी नातेवाईकांना सांगितले होते. उपचार सुरू असतानाच ५ सप्टेंबर रोजी रुग्णाचा मृत्यू झाला. यानंतर रुग्णाच्या मृत्यूवरून हॉस्पिटल प्रशासन आणि संबंधितांमध्ये वाद निर्माण झाला.




हॉस्पिटल संचालक डॉ. मुरली बालसुंदरम कसियामल यांनी पोलिसांकडे दिलेल्या तक्रारीत गंभीर आरोप केले आहेत. त्यांच्या म्हणण्यानुसार, काही जण हॉस्पिटलमध्ये आले आणि रुग्णाचा मृतदेह घेऊन जाणे, पत्रकार परिषद घेऊन हॉस्पिटलची बदनामी करणे, हॉस्पिटलचा परवाना रद्द करण्यासाठी कारवाई करण्यास भाग पाडणे, तसेच डॉक्टरांना खोट्या गुन्ह्यात अडकवण्याची धमकी देत होते. हे प्रकरण मिटवण्यासाठी १२ लाख रुपयांची मागणी करण्यात आल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. त्यापैकी १० लाख रुपये स्वतःसाठी आणि २ लाख रुपये रुग्णाच्या नातेवाईकांसाठी मागितल्याचा आरोपही समोर आला आहे. या संदर्भात ऑडिओ रेकॉर्डिंगसह तक्रार करण्यात आल्याचे वृत्त आहे.या प्रकरणी शिंदे गटाच्या शिवसेनेच्या ७ पदाधिकाऱ्यां विरोधात नागपूरच्या पाचपावली पोलीस ठाण्यात खंडणीसह विविध कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा दाखल झालेल्यामध्ये युवासेनेचे जिल्हाप्रमुख शरद सरोदे, महिला आघाडीच्या प्रमुख मनीषा पापडकर, उपजिल्हाप्रमुख पंकज खिंची यांच्यासह मुल्ला सिंह गौर, प्रतीक बहुगुणा, महेश ढोले आणि शुभम साठे यांचा समावेश असल्याची माहिती समोर आली आहे. पोलिसांकडून या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे. आरोपींवरील आरोप अद्याप न्यायालयात सिद्ध झालेले नाहीत.

# वर्धेत उभारणार ३४ कोटींचे हायटेक प्रशिक्षण केंद्र

## पालकमंत्र्यांचा यशस्वी पाठपुरावा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२वर्धा,** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील सरकार पोलीस कल्याणाची नेहमी ग्वाही देत असते. पोलीस वसाहती, आधुनिक वाहने व शस्त्रे, प्रशिक्षण केंद्र आदी आदी. पण हे खरंच होणार कां, असा प्रश्न पोलिसांनाच नव्हे तर नागरिकांना पण पडत असतो. आता त्याचे उत्तर एका गोष्टीतून येत आहे, असे म्हणता येईल. ते पण राज्यात दुसरेच असे केंद्र ठरत असल्याने.



महाराष्ट्र राज्य राखीव पोलीस बलाच्या (डठझऋ) सक्षमीकरणाच्या दृष्टीने राज्य शासनाने गुरुवारी एक अत्यंत महत्त्वपूर्ण आणि धोरणात्मक निर्णय घेतला आहे. गेल्या अनेक दशकांपासून पुणे जिल्ह्यातील नानवीज (दौंड) येथील एकमेव प्रशिक्षण केंद्रावर पडणाऱ्या प्रचंड ताणातून सुटका करण्यासाठी आता विदर्भात भव्य आणि आधुनिक सुविधांयुक्त नवीन प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यास गृह विभागाने मंजुरी दिली आहे. १ ऑक्टोबर २०२६ रोजी यासंदर्भातील अधिकृत शासन निर्णय (ऋठ) जारी करण्यात आला असून, यामुळे विदर्भ परिसरातील एसआरपीएफच्या सर्व गटांसाठी प्रशिक्षणाची नवी कवाडे उघडली जाणार आहेत.

सध्या राज्य राखीव पोलीस बलांतर्गत एकूण २० गट कार्यरत असून नवीन भरती झालेल्या पोलीस शिपायांचे मूलभूत प्रशिक्षण तसेच सेवेत असलेल्या पोलीस अधिकारी व अंमलदारांचे सेवांतर्गत प्रशिक्षण केवळ दौंड येथील नानवीज केंद्रात पार पाडले जाते. मात्र वाढती पोलीस भरती आणि प्रशिक्षणार्थींची मोठी संख्या लक्षात घेता नानवीज येथील क्षमता अपुरी पडत होती. या पार्श्वभूमीवर वर्धा येथे उपलब्ध असलेल्या सुमारे २०० एकर जागेवर हे नवीन केंद्र उभारले जाणार असून वर्ध्याच्या जिल्हाधिकाऱ्यांनी या जमिनीच्या हस्तांतरणासाठी तत्त्वतः मान्यता दर्शवली आहे.

# राज-उद्धव ठाकरेंच्या मोर्चाचा मार्ग बदलला

## मेट्रो सिनेमा ते आझाद मैदान असा जाणार मोर्चा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२मुंबई-** केंद्रीय निवडणुक आयोगाचा अंतर्गत वाद चव्हाट्यावर आल्यानंतर ज्ञानेश कुमारांविरोधात वातावरण तापलं आहे. तसेच त्यांच्या विरोधात ठाकरे बंधूंनी देखील एल्गार पुकारला आहे. ४ ऑक्टोबर रोजी, रविवारी मुंबईत मनसे आणि ठाकरेसेनेचा संयुक्त महामोर्चा निघणार आहे. पण त्याआधीच महत्वाची अपडेट समोर आली आहे. या मोर्चाच्या मार्गात बदल करण्यात आला आहे. या मोर्चाची जोरदार तयारी सुरू असतानाच या मोर्चाच्या मार्गात बदल करण्यात आल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे.




याआधी हा मोर्चा भायखळा ते आझाद मैदान असा जाणार होता. उद्धव आणि राज ठाकरे यांच्या नेतृत्वात हा मोर्चा निघणार असून राज्यभरातून शिवसैनिक आणि मनसैनिक येण्याची शक्यता आहे. या मोर्चासाठी जय्यत तयारी सुरू असतानाच आता मोर्चाच्या मार्गात मोठा बदल करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. ठाकरे बंधूंचा हा मोर्चा मेट्रो सिनेमा ते आझाद मैदान असा जाणार आहे. मोर्चाचे अंतर थोडे कमी झाल्याचे दिसून येत आहे. रविवारी सकाळी १० वाजता हा मोर्चा सुरू होणार आहे.

रविवारी ४ ऑक्टोबर रोजी मेट्रो सिनेमापासून हा मोर्चा निघेल. राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्या संयुक्त मोर्चाला सकाळी ११ वाजता सुरुवात होण्याची शक्यता आहे. दहा वाजता या मोर्चाला जमा होण्यास सुरुवात होईल. हा मोर्चा पुढे जात महापालिकेसमोर येईल. या ठिकाणी मोर्चाचे सभेत रूपांतर होणार असून मोठा स्टेज उभारला जणार आहे. या मोर्चामध्ये मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी होणार असून ठाकरे बंधू काय भाष्य करता याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

# मनोज जरागेंच्या ११ समर्थकांविरोधात गुन्हा

## महिलेला अश्लील मेसेज अन् धमकी देणं पडलं महागात

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२जालना-** मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या समर्थकांविरोधात अंबड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सोशल मीडियावर धमकी देणे, अश्लील आरोप आणि बदनामीकारक मजकूर तसेच फोटो-व्हिडिओ प्रसारित केल्याच्या तक्रारीवरून ही कारवाई करण्यात आली आहे. जरांगे पाटील यांच्या आंदोलनातील सक्रिय महिला आंदोलक ललिता तारक यांनी याप्रकरणी पोलिसांत तक्रार दाखल केली आहे. सोशल मीडियावर आपल्याविरोधात अश्लील शिवीगाळ, बदनामीकारक मजकूर आणि धमकीच्या पोस्ट करण्यात आल्या. तसेच, एआय तंत्रज्ञानाचा वापर करून अश्लील फोटो आणि व्हिडीओ तयार करून ते प्रसारित केल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. तक्रारीसोबत संबंधित सोशल मीडिया अकाऊंटचे स्क्रीनशॉट आणि फोन कॉलचे पुरावे पोलिसांकडे देण्यात आल्याचे वृत्त आहे.या प्रकरणात १० ते ११ जणांविरोधात, त्यापैकी पाच जणांसह काही अज्ञात व्यक्तींविरोधात गुन्हा दाखल झाल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकरणाचा तपास अंबड पोलीस करत आहेत. दरम्यान, ललिता तारक यांच्या तक्रारीबाबत मनोज जरांगे पाटील यांना विचारले असता, त्यांना त्रास झाला, त्यांनी अर्ज केला. त्यावर मी काही बोलणार नाही अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली.विभागीय आयुक्तांकडे अपील करण्यासंदर्भातील प्रश्नावरही जरांगे यांनी न्यायालयीन प्रक्रियेचा संदर्भ देत प्रकरण न्यायालयात असल्याचे सांगितले. तसेच, काही सहकाऱ्यांना ईडीची नोटीस आल्याच्या चर्चेबाबत बोलताना जरांगे यांनी कशाची नोटीस आहे, ईडीची येऊ द्या, सीबीआयची येऊ द्या, अशी प्रतिक्रिया दिली. आंदोलन मोडीत काढण्यासाठी दबाव आणला जात असल्याचा आरोपही त्यांनी केला.



## संपादकीय ......

# गांधीजींच्या विचारांची गरज आजही आणि उद्याही

*आज माणसाकडे पूर्वीपेक्षा अधिक सुविधा आहेत. माहिती एका क्षणात मिळते. जगाच्या कोणत्याही कोपर्यातील माणसाशी क्षणात संपर्क साधता येतो. पण तरीही माणूस अधिक अस्वस्थ आहे. संपर्काची साधनं वाढली, पण संवाद कमी झाला. वस्तू वाढल्या, पण समाधान कमी झालं. वेग वाढला, पण थांबून विचार करण्याची सवय कमी झाली. महात्मा गांधीजींचा संयम अशा वेळी आपल्याला थांबवतो आणि विचारायला लावतो की आपण नेमकं कुठे चाललो आहोत. त्यामुळे गांधीजींच्या विचारांची गरज राहणार आहे. आजही आणि उद्याही.*

*रात्रीची वेळ होती. दक्षिण आफ्रिकेतील पीटरमॉरिट्झबर्ग रेल्वे स्थानकावर एक तरुण भारतीय थंडीने कुडकुडत बसला होता. अंगावर साधा पोशाख होता. हातात सामान.. खिशात पहिल्या वर्गाचं वैध तिकीट तरी त्याला रेल्वेच्या डब्यातून बाहेर फेकण्यात आलं. त्याचा गुन्हा एवढाच होता की तो भारतीय होता. त्या तरुणाचं नाव होतं मोहनदास करमचंद गांधी. त्या रात्री झालेला अपमान त्यांच्या आयुष्याला वेगळी दिशा देणारा क्षण ठरला. त्यांच्या हातात शस्त्र नव्हतं, मागे कोणती संघटना नव्हती, समोरचा अन्याय मोठा होता. तरी त्या रात्री त्यांनी एक वेगळा निर्णय घेतला. या अन्यायाला उत्तर द्यायचं, पण द्वेषाने नाही. संघर्ष करायचा, पण हिंसेच्या मार्गाने नाही. पुढे याच विचारातून सत्याग्रहाची संकल्पना आकाराला आली आणि जगाच्या इतिहासात एका नव्या अध्यायाची सुरुवात झाली.*

*गांधीजी समजून घ्यायचे असतील तर त्यांच्या पुतळ्यांकडे पाहून किंवा जयंतीनिमित्त दोन शब्द बोलून भागणार नाही. त्यांच्या आयुष्यातील प्रसंगांकडे पाहावं लागेल. त्यांनी जे सांगितलं, ते आधी स्वत: जगून दाखवलं. सत्याबद्दल बोलणं, अहिंसेचा पुरस्कार करणं, साधेपणाचं महत्त्व सांगणं सोपं आहे. पण स्वत:च्या आयुष्यात या मूल्यांची किंमत मोजणं कठीण आहे. गांधीजींनी ही कठीण वाट निवडली. दक्षिण आफ्रिकेतील त्या रेल्वेच्या घटनेनंतर गांधीजींचा प्रवास थांबला नाही. उलट तो अधिक कठीण होत गेला. अन्यायाविरुद्ध लढायचं, पण अन्याय करणार्या माणसाचा द्वेष करायचा नाही, हा विचार त्यांच्या जीवनाचा आधार बनला. त्यांच्या अहिंसेचा अर्थ हातावर हात ठेवून गप्प बसणं असा नव्हता. अन्यायासमोर ठामपणे उभं राहणं, पण प्रतिकाराला सूडाचं रूप येऊ न देणं, ही त्यांची अहिंसा होती. म्हणूनच गांधीजींच्या विचारातील अहिंसा ही कमजोरी नव्हती. ती आत्मसंयमातून आलेली ताकद होती. समोरच्याला पराभूत करण्यापेक्षा त्याच्या विवेकाला जागं करण्याचा प्रयत्न होता.*

*१९३० मध्ये मिठाच्या कायद्याविरुद्ध त्यांनी सुरू केलेली दांडी यात्रा हा या विचाराचा विलक्षण आविष्कार होता. समुद्रकिनार्यावर सहज मिळणारं मीठही ब्रिटिश सरकारच्या कायद्यामुळे सामान्य भारतीयासाठी निर्बंधित होतं. गांधीजींनी या कायद्याला आव्हान देण्यासाठी साबरमतीहून दांडीकडे पदयात्रा सुरू केली. सोबत सुरुवातीला केवळ ८० सत्याग्रही होते. शेकडो किलोमीटरचा प्रवास करायचा होता. हातात बंदूक नव्हती, तलवार नव्हती, सैन्य नव्हतं. होती ती फक्त चालणारी माणसं आणि अन्यायाविरुद्ध उभं राहण्याची नैतिक ताकद. शेवटी समुद्राच्या किनार्यावर गांधीजींनी मिठाची एक मूठ उचलली. मोठा बदल घडवण्यासाठी नेहमी मोठी साधनं लागतातच असं नाही, हे त्यांनी दाखवून दिलं. आजच्या काळात या प्रसंगाकडे पाहताना गांधीजींचा विचार आणखी महत्त्वाचा वाटतो. मतभेद झाला की समोरच्याला शत्रू मानण्याची घाई होते. समाजमाध्यमांमुळे हा राग काही क्षणांत हजारो लोकांपर्यंत पोहोचतो. शब्दांपासून सुरुवात होते आणि कधी कधी द्वेषापर्यंत गोष्ट जाते. गांधीजींचा मार्ग याच्या उलट होता. विरोध करा, पण समोरचं माणूसपण नाकारू नका. संघर्ष करा, पण संवादाची दारं बंद करू नका. अन्यायाविरुद्ध उभे राहा, पण अन्यायाला उत्तर देताना स्वत:च अन्यायाच्या मार्गावर जाऊ नका.*

*पर्यावरणाच्या प्रश्नातही गांधीजींचा विचार आज नव्याने समोर येतो. पृथ्वीवरील साधनसंपत्ती मर्यादित आहे. मात्र माणसाच्या गरजा आणि त्याहून अधिक त्याची हाव वाढत चालली आहे. अधिक उत्पादन, अधिक उपभोग आणि अधिक सुविधा यांनाच विकासाचं माप मानलं जात आहे. त्याची किंमत मात्र निसर्ग चुकवत आहे. जंगलं कमी होत आहेत, नद्या प्रदूषित होत आहेत आणि हवामान बदलाचं संकट तीव्र होत आहे. गांधीजींचा साधेपणा या सगळ्यावर एक मूलभूत प्रश्न विचारतो-आपल्याला खरंच किती हवं आहे? गरज भागवणं आणि हाव भागवणं यातला फरक आपण कधी करणार? गांधीजींच्या जीवनातील आणखी एक प्रसंग त्यांच्या विचारांची खरी ताकद दाखवतो. १९४६ मध्ये नोआखलीत जातीय हिंसा उसळली होती. लोकांच्या मनात भीती होती. गावोगाव अविश्वास पसरला होता. अशा वेळी ७७ वर्षांचे गांधीजी सुरक्षित राजकीय वातावरणात बसले नाहीत. ते हिंसाग्रस्त भागात गेले. गावोगाव फिरले. अनेक ठिकाणी अनवाणी चालले. लोकांशी बोलले. त्यांच्या जखमा समजून घेण्याचा प्रयत्न केला. त्या काळात सत्ता, फाळणी आणि भविष्यातील सरकार यांची चर्चा सुरू होती. पण गांधीजींच्या नजरेसमोर सामान्य माणसाच्या भीतीचा प्रश्न होता. स्वातंत्र्य मिळणार होतं; पण जर माणूस माणसापासूनच घाबरत असेल तर त्या स्वातंत्र्याचा अर्थ काय?*

*कलकत्त्यातही त्यांनी हिंसेच्या काळात लोकांच्या मध्ये उभं राहण्याचा निर्णय घेतला. भारत स्वतंत्र झाला तेव्हा दिल्लीमध्ये जल्लोष होता. पण गांधीजी तिथे नव्हते. ते कलकत्त्यात होते. कारण त्यांच्यासाठी स्वातंत्र्याचा अर्थ केवळ ब्रिटिश सत्ता संपली एवढा नव्हता. माणसाच्या मनातील भीती, द्वेष आणि हिंसा कमी झाली पाहिजे, हे त्यांच्यासाठी तितकंच महत्त्वाचं होतं. गांधीजींना देवत्व देणं सोपं आहे. त्यांच्या पुतळ्याला हार घालणं सोपं आहे. जयंती साजरी करणं सोपं आहे. पण गांधीजींच्या विचारांप्रमाणे जगणं कठीण आहे. कारण गांधीजी आपल्याला दुसर्याच्या चुका मोजायला सांगत नाहीत. ते आधी स्वत:कडे पाहायला भाग पाडतात. मी जे बोलतो तेच करतो का? माझ्या गरजा खरंच एवढ्या आहेत का? दुसर्याच्या हक्काचा मी किती विचार करतो? माझ्याशी मतभेद असलेल्या माणसाला मी किती सहन करतो? अन्याय झाला तर मी गप्प बसतो की त्याविरुद्ध उभा राहतो? आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे मला सोयीचं वाटतं म्हणून मी एखाद्या गोष्टीला सत्य मानतो का?*

*जग बदललं आहे. तंत्रज्ञान बदललं आहे. समाजाची रचना बदलली आहे. राजकारणाची भाषा बदलली आहे. पण माणसाला सत्याची गरज संपलेली नाही. अहिंसेची गरज संपलेली नाही. संयमाची गरज संपलेली नाही. पर्यावरणाचं भान ठेवण्याची गरज संपलेली नाही. आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे दुसर्या माणसाकडे माणूस म्हणून पाहण्याची गरज संपलेली नाही. म्हणून गांधीजींचं खरं स्मरण पुतळ्यांमध्ये नाही. ते आचरणात आहे. ते घोषणांमध्ये नाही. ते प्रश्न विचारण्यात आहे. ते केवळ कालचे नाहीत. ते आजचेही आहेत. आणि कदाचित उद्याचेही आहेत. जोपर्यंत माणसाला सत्याची गरज आहे, जोपर्यंत हिंसेऐवजी संवादाचा मार्ग शोधावा लागतो, जोपर्यंत पृथ्वी वाचवण्यासाठी आपल्या हावेला मर्यादा घालावी लागते आणि जोपर्यंत माणसाला दुसर्या माणसातला माणूस शोधायचा आहे, तोपर्यंत गांधीजींच्या विचारांची गरज राहणार आहे. आजही. उद्याही.*

# मातीत गांधी विचारांचा सुगंध, पण 'स्वावलंबी गाव' कुठे?

## रोजगार, शिक्षण, मूलभूत सुविधांच्या शोधात खेड्याकडून शहरांकडेच स्थलांतर वाढले

'खेड्याकडे चला' हा महात्मा गांधींचा विचार स्वातंत्र्यानंतर सातत्याने सांगितला गेला, मात्र गांधीजींच्या स्वप्नातील स्वावलंबी आणि स्वयंपूर्ण गाव आजही पूर्णत्वास आलेले दिसत नाही. उलट, रोजगार, शिक्षण आणि मूलभूत सुविधांच्या शोधात खेड्याकडून शहराकडे होणारे स्थलांतर वाढतच आहे. ग्रामीण अर्थकारणाला बळकटी मिळाल्याशिवाय ग्रामस्वराज्याची संकल्पना प्रत्यक्षात उतरणार कशी, हा प्रश्न गांधी जयंतीच्या निमित्ताने पुन्हा ऐरणीवर आला आहे.

शेतकरी संभाजी टेटर यांच्या मते, खेडे स्वयंपूर्ण झाले तरच देश स्वयंपूर्ण होईल, हा गांधीजींचा विचार आजच्या ग्रामीण वास्तवात अधिक महत्त्वाचा आहे. मात्र ग्रामीण भागात त्या विचारांचे अपेक्षित परिपोषण होत नसल्याची खंत ते व्यक्त करतात. शेतकरी नेते मनीष जाधव यांच्या मते, गांधी विचारांची अंमलबजावणी अनेकदा योजनांना गांधीजींचे नाव देण्यापुरती मर्यादित राहते. कापूस, सोयाबीन आणि शेतीवर आधारित अर्थव्यवस्था असलेल्या पुसद तालुक्यात ग्रामस्वराज्याची मुळे मजबूत करण्यासाठी तरुण पिढीने पुढाकार घेण्याची गरज आहे. 'स्वच्छता हीच ईश्वरसेवा' हा गांधीजींचा संदेश आज 'स्वच्छ भारत अभियानातून' पुढे नेला जात आहे. गावोगावी स्वच्छता फेरी, ग्रामसफाई, शौचालय बांधणी आणि जनजागृतीचे उपक्रम होत आहेत. 'घर तिथे शौचालय' मोहिमेमुळे परिस्थितीत बदल झाला असला तरी काही गावांच्या पांदणी आणि सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छतेचे चित्र अजूनही कायम आहे. दुसरीकडे, शाळांमधील हात धुण्याच्या उपक्रमातून बालकांमध्ये स्वच्छतेची सवय रुजत असल्याचे सकारात्मक चित्र दिसते.




### गांधी जयंती विशेष

### गांधीविचार गावांत रुजले पाहिजे

आज अनेक तरुणांच्या मनातील गांधीजींचे चित्र नोटेवरील छायाचित्र, दोन ऑक्टोबरची सुट्टी आणि शालेय निबंध यापुरते मर्यादित राहू नये. सत्य, अहिंसा, स्वच्छता, ग्रामोद्योग, दारूबंदी आणि व्यसनमुक्ती या गांधीविचारांना गावच्या दैनंदिन जीवनाशी जोडल्याशिवाय 'स्वावलंबी गाव' साकार होणार नाही, एकूण जनमानसाचा सूर हाच दिसून आला.

### बचत गट प्रभावी माध्यम

गांधीजींच्या चरख्यात दडलेला ग्रामोद्योगाचा विचार आज महिला बचत गटांच्या माध्यमातून नव्या रूपात पुढे येत आहे. चोंढी येथील महिला बचत गटाने अनुदानाच्या माध्यमातून डाळ मिल आणि शिवणकाम सुरू केले आहे. 'आम्ही आता बाजारावर अवलंबून नाही,' असे गटाच्या अध्यक्ष माया आगलावे सांगतात. ग्रामीण महिलांना उत्पादन, प्रक्रिया आणि स्वयंरोजगाराशी जोडणारे बचत गट हे आर्थिक स्वावलंबनाचे प्रभावी माध्यम ठरत आहेत.

### रोहयोची प्रभावी अंमलबजावणी आवश्यक

ग्रामस्वराज्याचा केंद्रबिंदू असलेल्या ग्रामसभेला मात्र अपेक्षित लोकसहभाग मिळत नसल्याची खंत व्यक्त होते. आरेगावचे अविनाश राठोडम्हणतात, गावचा कारभार गावानेच चालवणे म्हणजे ग्रामस्वराज्य, पण ग्रामसभेकडेच नागरिकांनी पाठ फिरवली तर हा विचार रुजणार कसा?, रोजगाराच्या संधींसाठी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्याची गरज अविनाश पोळकट यांनी व्यक्त केली.

# अमरावतीच्या कुंकूम मोहोडचा आशियाई स्पर्धेत सुवर्णवेध!

## महिला रिकर्व्ह संघातून ऐतिहासिक सुवर्ण; मिश्र दुहेरीत रौप्यपदक, उद्याच्या एकेरीकडे देशाचे लक्ष

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

आशियाई क्रीडा स्पर्धेत अमरावतीची १७ वर्षीय तिरंदाज कुंकूम अनिल मोहोड हिने भारतीय महिला रिकर्व्ह तिरंदाजी संघाचे प्रतिनिधित्व करत ऐतिहासिक सुवर्णपदक पटकावले. गुरुवारी झालेल्या सांघिक अंतिम सामन्यात भारताने बलाढ्य दक्षिण कोरियाचा ५-३ असा पराभव करत सुवर्णपदकावर नाव कोरले.कुंकूम मोहोड, अंकिता भकत आणि कीर्ती यांच्या भारतीय संघासमोर जागतिक स्तरावरील बलाढ्य दक्षिण कोरियाचे आव्हान होते. अत्यंत चुरशीच्या झालेल्या अंतिम सामन्यात भारतीय खेळाडूंनी संयमी आणि अचूक कामगिरी करत कोरियावर मात केली. सामन्याच्या निर्णायक क्षणी



कुंकूमने अचूक १० गुणांचा वेध घेत भारताच्या सुवर्णपदकावर शिक्कामोर्तब केले.कुंकूमच्या या कामगिरीमुळे अमरावतीसह संपूर्ण महाराष्ट्राच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे. अवघ्या १७व्या वर्षी आंतरराष्ट्रीय स्तरावर अशी उल्लेखनीय कामगिरी केल्याने तिच्यावर सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.दरम्यान, आज झालेल्या मिश्र दुहेरीच्या स्पर्धेतही कुंकूमने दमदार कामगिरी केली. धीरज ब्रह्मदेवरा याच्यासोबत खेळताना कुंकूमने रौप्यपदक पटकावले. त्यामुळे तिच्या खात्यात सांघिक सुवर्णासह मिश्र दुहेरीचे रौप्यपदक जमा झाले आहे.

आता उद्या होणाऱ्या एकेरी तिरंदाजी स्पर्धेकडे क्रीडाप्रेमींसह संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे. सांघिक आणि दुहेरीत पदकांची कमाई केल्यानंतर कुंकूम एकेरीतही आपली अचूकता आणि आत्मविश्वास दाखविण्यास सज्ज झाली आहे.

# नेरपिंगळाईच्या विसर्जनस्थळी गणरायाच्या मूर्ती अर्धवट अवस्थेत



## हात-पाय तुटलेल्या मूर्ती उघड्यावर; प्रशासनाने लक्ष देण्याची भाविकांची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२नेरपिंगळाई** : दहा दिवस भक्तिभावाने पूजा-अर्चना केलेल्या गणरायाच्या मूर्ती विसर्जनानंतर नेरपिंगळाई येथील विसर्जनस्थळी अर्धवट अवस्थेत उघड्यावर पडून असल्याचे चित्र समोर आले आहे. कुठल्या मूर्तीचा हात, तर कुठल्या मूर्तीचे पाय तुटलेल्या अवस्थेत दिसत असून काही मूर्तींचे पूर्ण विसर्जनच झालेले नाही. त्यामुळे मूर्तींची विटंबना होण्याची भीती भाविकांनी व्यक्त केली आहे.यंदा पावसाने दांडी मारल्याने त्याचा परिणाम गणेशोत्सवावरही झाला. गावातील मानाच्या गुरु गंगाधर स्वामी मठातील गणपतीसह सुमारे ३५ मंडळांनी गणरायाची स्थापना केली होती. दहा दिवस विविध धार्मिक कार्यक्रम व ढोल-ताशांच्या गजरात उत्सव साजरा केल्यानंतर विसर्जन करण्यात आले. मात्र, विसर्जनस्थळी पुरेसे पाणी नसल्याने शेतकऱ्यांच्या मदतीने पाणी सोडण्यात आले. पाण्याअभावी काही मातीच्या मूर्तींचे विसर्जन झाले; मात्र अनेक मूर्ती अर्धवट राहिल्या.अर्धवट मूर्ती ट्रॅक्टरमध्ये भरून त्यांचे योग्य पद्धतीने पूर्ण विसर्जन करावे, अशी मागणी भाविकांनी केली आहे. विसर्जन मिरवणुकीत प्रसिद्धीसाठी पुढाकार घेणाऱ्या मंडळांनीही आता या मूर्तींच्या योग्य विसर्जनासाठी पुढाकार घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# अवैध सावकारांवर सहकार विभागाची मोठी कारवाई!

## धाडीत १३ लाखांची रोकड अन् तब्बल ८८ किलो चांदीचे घबाड जप्त

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अकोला-** अवैध सावकारीचे प्रकार मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. अवैध सावकारी व्यवहारासंदर्भात प्राप्त तक्रारीची दखल घेत सहकार विभागाने महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ मधील कलम १६ अंतर्गत आज वाशीम येथे दोन ठिकाणी झडतीची कारवाई केली. या कारवाईत १३ लाख ३०० रुपये रोख रक्कम आणि ८८ किलो चांदीचे मोठे घबाड पथकाच्या हाती लागले. कथित अवैध सावकारी व्यवहाराच्या पुढील चौकशीसाठी विविध महत्त्वाची कागदपत्रे ताब्यात घेण्यात आली आहेत. या कारवाईमुळे मोठी खळबळ उडाली.

**चौकशीसाठी कागदपत्रे ताब्यात-** अवैध सावकारीतून अनेकांचे जीवन उद्धवस्त झाले. विशेषतः शेतकरी कर्जबाजारी होऊन अवैध सावकारीचे बळी ठरतात. दरम्यान, सहकार विभागाकडे एका व्यक्तीने अवैध सावकारी व्यवहारासंदर्भात तक्रार दाखल केली होती. त्याअनुषंगाने सहकार विभाग आणि पोलीस विभागाच्या दोन पथकांनी दोन व्यावसायिकांच्या ठिकाणी झडती घेतली. या कारवाईदरम्यान स्थावर मालमत्तेची कागदपत्रे, खरेदीखते, करारनामे, कोरे व निनावी धनादेश, कोरे बाँड तसेच सावकारी व्यवहारासंदर्भातील रजिस्टर आदी कागदपत्रे पुढील चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आली आहेत.

**सावकारी कायद्यानुसार चौकशी-** सहकार विभागाने केलेल्या कारवाईत १३ लाख ३०० रुपये रोख रक्कम आणि ८८




किलो चांदी आढळून आली. या प्रकरणात सावकारी कायद्यानुसार पुढील चौकशी सुरू आहे. ही कारवाई जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, पोलीस अधीक्षक निकेश खाटमोडे आणि विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था गौतम वर्धन यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था माणिक लटपटे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. सहायक निबंधक ईश्वर काबरा आणि पी.टी. सरकटे यांनी पथकप्रमुख म्हणून जबाबदारी सांभाळली. कारवाईसाठी जी.एन. कुकडे, ए.बी. सावंत, एस.पी. सांगळे, रुबीया शेख, व्ही.आर. ढोबळे, भारती इगळे, परेश राऊत आणि राजकुमार भगत यांनी सहायक म्हणून काम पाहिले. रवि आकुलवार आणि मारोती भेंडेकर यांनी आवश्यक नियोजन व व्यवस्था केली.

**गोपनीय तक्रारीसाठी नागरिकांनी पुढे यावे-** अवैध सावकारी करणाऱ्या व्यक्तींवर प्रभावी नियंत्रण ठेवून कायदेशीर कारवाई करण्यासाठी नागरिकांनी अशा व्यवहारांची माहिती सहकार विभागाकडे द्यावी. जिल्हा निबंधक (सावकारी) तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था कार्यालयाकडे गोपनीय स्वरूपात तक्रार करता येणार असून तक्रारदाराचे नाव गुप्त ठेवण्यात येईल, अशी माहिती एम.एस. लटपटे यांनी दिली.

# बुस्टर कंपनीच्या बियाण्यांमुळे नुकसान झाल्याचा आरोप

## भरपाईसाठी आठ युवा स्वाभिमानचा आठ दिवसांचा अल्टिमेटम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती :**

खरीप हंगामासाठी बुस्टर कंपनीचे बियाणे खरेदी करून पेरणी केलेल्या अमरावती जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांचे अपेक्षित उगवण, वाढ व उत्पादन न झाल्याने आर्थिक नुकसान झाल्याचा आरोप युवा स्वाभिमान पक्षाने केला आहे. या प्रकरणाची तातडीने चौकशी करून बाधित शेतकऱ्यांना कंपनीकडून नुकसानभरपाई मिळवून द्यावी, तसेच संबंधितांविरुद्ध कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी पक्षाच्या वतीने करण्यात आली आहे.युवा स्वाभिमान पक्षाने प्रशासनाला दिलेल्या निवेदनानुसार, शेतकऱ्यांनी बियाणे, पेरणी, मशागत, खत, औषध फवारणी, मजुरी आदींसाठी मोठा खर्च केला. मात्र बियाण्यांबाबतच्या तक्रारींमुळे अपेक्षित उत्पादन न मिळाल्याने शेतकऱ्यांचा संपूर्ण खरीप हंगाम धोक्यात आल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.बुस्टर कंपनीचे संचालक गजानन जाधव, संध्या जाधव, शंतनु मोगल व सरजेराव मोगल तसेच संबंधित जबाबदार व्यक्तींविरुद्ध चौकशी करून फौजदारी गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचे नुकसान संबंधित



कंपनीकडून वसूल करून त्यांना तात्काळ भरपाई देण्याची मागणी करण्यात आली आहे.प्रशासनाने या निवेदनाच्या दिनांकापासून आठ दिवसांच्या आत चौकशी व कायदेशीर कारवाईची प्रक्रिया सुरू करावी, अशी मागणी पक्षाने केली आहे. या कालावधीत ठोस कार्यवाही न झाल्यास बाधित शेतकऱ्यांना सोबत घेऊन लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन करण्याचा इशाराही देण्यात आला आहे.निवेदनावर युवा स्वाभिमान पक्षाचे जिल्हाध्यक्ष प्रकाश साबळे, महिला जिल्हाध्यक्ष सोनाली नवले, दर्यापूर विधानसभा प्रमुख संजय भारसाकळे यांच्यासह विविध पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.-

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

# ‘अल निनो’ चे रूपांतर ‘सुपर अल निनो’ मध्ये होणार

## आगामी काळात अतिउष्णतेची शक्यता

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

‘अल निनो’चे रूपांतर ‘सुपर अल निनो’मध्ये होऊ लागल्याने आगामी काळात अतिउष्णतेची शक्यता आहे. तापमानात ३.९ अंशांपर्यंत वाढ होण्याची शक्यता असून, बाष्पीभवन वाढल्याने उपलब्ध पाणीसाठ्यावर ताण येणार आहे. सुपर अल निनोचा प्रभाव जुलैपर्यंत राहण्याची शक्यता असल्याने पाणीपुरवठ्याची समस्या भीषण होण्याची शक्यता आहे. त्याचा परिणाम यंदाच्या रब्बी हंगामासह पुढील वर्षीच्या खरीप हंगामावरही होण्याची शक्यता तज्ज्ञांनी वर्तविली आहे. यंदाच्या हंगामात ‘अल निनो’चे संकट राहण्याचा अंदाज हवामान खात्याने आधीच दिला होता. त्या पार्श्वभूमीवर यंदाच्या पावसाळ्यात पावसाची मोठी तूट निर्माण झाली. जिल्ह्यात ४४ टक्के तूट नोंदविण्यात आली आहे. याचा एकूणच परिणाम खरिपातील पिकांवर झाला असून, जलपातळीत घट आणि




जलसाठ्यातही कमतरता निर्माण झाली आहे. जिल्ह्यात सद्यःस्थितीत ५८ टक्के जलसाठा उपलब्ध आहे. भूजलाची पातळी घटली असून, सिंचन प्रकल्पांमधील जलसाठ्यावरही ताण वाढला आहे. उपलब्ध सिंचन प्रकल्पांतील जलसाठा आणि अन्य जलस्रोतांवरच रब्बी हंगाम मोठ्या प्रमाणावर अवलंबून आहे. जिल्ह्यात जवळपास दोन ते अडीच लाख हेक्टर क्षेत्रात रब्बी हंगाम घेतला जातो. सिंचन प्रकल्पांमधील जलसाठ्यातून पाणीपुरवठ्याला प्राधान्य देण्याचे निर्देश आहेत. त्यामुळे सिंचनासाठी पुरेशी आवर्तने देणे अशक्य होणार असल्याचे जलसंपदा विभागाने म्हटले आहे. पाणीसाठ्याचे नियोजन जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली १५ ऑक्टोबरदरम्यान करण्यात येणार असून, त्यानंतरच सिंचनाची आवर्तने स्पष्ट होणार आहेत. आगामी काळात पावसाची शक्यता कमी असून, ‘सुपर अल निनो’च्या पार्श्वभूमीवर पुढील वर्षीच्या जुलैपर्यंत पाणीसाठ्याचे नियोजन करावे लागणार आहे. उपलब्ध साठ्याचा विचार करता यंदाचा रब्बी हंगाम धोक्यात आला आहे. सुपर अल निनोच्या प्रभावामुळे आगामी काळात तापमानाचा पारा ३.९ अंशांपर्यंत वाढण्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. त्यामुळे यंदाचा उन्हाळा सर्वाधिक उष्णतेचा राहण्याची शक्यता आहे. परतीच्या पावसाने पाठ फिरवल्याने आगामी काळात पावसाची शक्यता कमी असून, वादळवाऱ्याचे मात्र संकेत आहेत.

### तापमान वाढ

सप्टेंबरमध्ये पावसाने दीर्घकाळ दडी मारल्याने तापमानात वाढ झाली आहे. सामान्यतः ३२ अंशांपर्यंत राहणारे तापमान ३६.६ अंशांवर गेले आहे. यापूर्वी सप्टेंबरच्या अखेरीस २०२३ मध्ये तापमान ३७.२ अंशांवर गेले होते. यंदा मात्र सप्टेंबरअखेर येण्यापूर्वीच तापमानाने ३६.६ अंशांचा टप्पा गाठला आहे.

# जिल्ह्याची नजरअंदाज आणेवारी ४७ पैसे

## दुष्काळी स्थितीवर शिक्कामोर्तब

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती–** यंदाच्या खरीप हंगामातील जिल्ह्याची नजरअंदाज आणेवारी सरासरी ४७ पैसे आली असून, एक हजार ९८५ गावांमध्ये ती ५० पैशांपेक्षा कमी आहे. त्यामुळे दुष्काळी स्थिती स्पष्ट झाली असून, अंतिम आणेवारीकडे प्रशासनाचे लक्ष लागले आहे. जिल्ह्यातील पिकांची नजरअंदाज आणेवारी ३० सप्टेंबरला जिल्हा महसूल प्रशासनाकडून जाहीर करण्यात आली. एकूण २ हजार १२ महसुली गावांपैकी १ हजार ९८५ गावांची आणेवारी सरासरी ४७ पैसे आली आहे.

यंदाच्या खरीप हंगामात पावसाची तूट मोठ्या प्रमाणावर असून, पावसात दीर्घ खंड पडला आहे. अपेक्षित पर्जन्यमान न झाल्याने पावसाची तूट ४४ टक्क्यांवर पोहोचली असून, त्याचा एकूणच परिणाम खरिपातील मुख्य पिकांसह सर्वच पिकांवर झाला आहे. जिल्ह्यातील सर्व चौदा तालुक्यांत दुष्काळाचा पहिला ट्रिगर लागू झाल्यानंतर शासनाने सरसकट पंचनामे करण्याचे आदेश निर्गमित केले आहेत. उत्पादनाची सरासरी घटली असल्याचा प्राथमिक अंदाज असून, या पार्श्वभूमीवर आणेवारी कमी येत असल्याने दुष्काळी मूल्यांकनात ती महत्त्वाची मानली जाते. अंतिम आणेवारीवर पुढील प्रक्रिया अवलंबून असली तरी, विद्यमान स्थितीत दुष्काळी स्थिती जाहीर झाली असल्याने उपाययोजनांसाठी आराखडे तयार करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. पिकांची स्थिती आणि संभाव्य टंचाईची तीव्रता समजून घेण्यासाठी आणेवारीचा उपयोग महत्त्वाचा प्रशासकीय निर्देशक म्हणून केला जातो.

शासनाच्या दुष्काळ निकषांमध्ये पीक पैसेवारीसह पर्जन्यमान, पेरणीचे प्रमाण, वनस्पती निर्देशांक, आर्द्रता स्थिती, चारा व पिण्याच्या पाण्याची उपलब्धता यांचा विचार केला जातो. त्यामुळे अंतिम आणेवारीसह अन्य निकषांच्या आधारे दुष्काळी उपाययोजनांची पुढील दिशा निश्चित होणार आहे.




### तालुकानिहाय नजर अंदाज आणेवारी

अचलपूर ४८, धारणी ४९, चिखलदरा ४९, धामणगावरेल्वे ४९, अमरावती ४८, भातकुली ४८, चांदूरबाजार ४८, अंजनगावसुर्जी ४८, चांदूररेल्वे ४७, मोर्शी ४७, वरुड ४७, तिवसा ४६, नांदगाव खंडेश्वर ४६ व दर्यापूर ४५.

# खेळाडूंना मिळणार घरबसल्या ‘क्रीडा ई-प्रमाणपत्र’




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती** गुणवंत खेळाडूंना शासकीय आणि निमशासकीय सेवांमध्ये पाच टक्के आरक्षणाचा लाभ अधिक सुलभ, पारदर्शक व जलदगतीने मिळावा, यासाठी क्रीडा व युवक सेवा संचालनालयाने खेळाडूंसाठी ‘क्रीडा ई-प्रमाणपत्र’ ही ब्लॉकचेन तंत्रज्ञानावर आधारित अद्ययावत प्रणाली कार्यान्वित केली आहे. या प्रणालीमुळे खेळाडूंना घरी बसून अत्यंत सोप्या पद्धतीने आपले क्रीडा ई-प्रमाणपत्र मिळवता येणार आहे. ही नवीन प्रणाली ब्लॉकचेन तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित आहे. त्यामुळे बोगस प्रमाणपत्रांच्या गैरप्रकारांना पूर्णपणे आळा बसेल. खेळाडूने पोर्टलवर माहिती भरल्यानंतर, ती मूळ डेटाशी जुळल्यास अवघ्या २४ तासांच्या आत डिजिटल पडताळणी अहवाल उपलब्ध होणार आहे. तसेच, प्रत्येक प्रमाणपत्रावर एक क्यूआर कोड सुरक्षा असेल. नियुक्ती प्राधिकारी हा क्यूआर कोड स्कॅन करून प्रमाणपत्राची सत्यता त्वरित पडताळू शकतील. महाराष्ट्र लोकसेवा आयोग तसेच इतर सर्व शासकीय पदभरतीसाठी अर्ज करताना खेळाडूंना आता हे ‘क्रीडा ई-प्रमाणपत्र’ जोडणे अनिवार्य करण्यात आले आहे. या प्रमाणपत्राशिवाय खेळाडू संवर्गातून अर्जाचा विचार केला जाणार नाही. ज्या खेळाडूंनी यापूर्वी विभागीय उपसंचालकांकडून प्रमाणपत्रांची पडताळणी करून घेतली आहे, त्यांनाही आगामी भरती प्रक्रियेसाठी या नवीन प्रणालीद्वारे प्रमाणपत्र तयार करून घेणे बंधनकारक आहे.

> कबड्डी, फेन्सिंग, ट्रायथलॉन (२०२५ ची स्पर्धा), ज्युडो (२०२४ ची स्पर्धा), कुराश (२०२४-२५ व २०१७-१८) या स्पर्धांचे अभिलेख ऑनलाइन उपलब्ध आहेत, त्याच खेळाडूंनी प्रमाणपत्रासाठी अर्ज करावेत. इतर पात्र खेळांच्या खेळाडूंनी नोंदणी करावी, इतर अभिलेख देखील अपलोड करण्याची कार्यवाही सुरू आहे. – **गणेश जाधव** जिल्हा क्रीडाधिकारी, अमरावती.

# शेतकरी कर्जमाफीची रक्कम अडकली

## कर्जवाटपही रखडले, जुन्या योजनेचा लाभ अपूर्णच

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अंजनगाव बारी**

ग्रामीण भागातील शेतकरी जुन्या कर्जमाफीच्या प्रलंबित लाभासह नव्या कर्जमाफीच्या रकमेच्या प्रतीक्षेत आहेत. आधार प्रमाणीकरण पूर्ण होऊनही काही पात्र शेतकऱ्यांच्या खात्यावर रक्कम जमा न झाल्याने कर्जवाटपाबाबतही संभ्रम कायम आहे. छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना-२०१७ अंतर्गत काही शेतकऱ्यांना अद्याप प्रलंबित लाभ मिळालेला नाही. त्याचवेळी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६ अंतर्गत आधार प्रमाणीकरण पूर्ण झाल्यानंतरही काही पात्र शेतकऱ्यांच्या खात्यावर कर्जमाफीची रक्कम जमा झालेली नसल्याचे सांगण्यात येत आहे. दरम्यान, सेवा सोसायटीच्या सचिवांकडून कर्जवाटपाची प्रक्रिया लवकर पूर्ण करण्याची मागणी होत आहे. कर्जमाफीचा लाभ मिळालेल्या तसेच आधार प्रमाणीकरण पूर्ण केलेल्या शेतकऱ्यांच्या खात्यावर शासनाची रक्कम जमा न झाल्याने लाभाची नेमकी प्रक्रिया आणि पुढील कार्यवाहीबाबत संभ्रम निर्माण झाला आहे. मागील कर्जमाफीचा प्रलंबित लाभ तातडीने द्यावा, नव्या योजनेतील पात्र शेतकऱ्यांच्या खात्यावर रक्कम जमा करावी आणि कर्जवाटपाची प्रक्रिया जलद करावी, अशी मागणी ग्रामीण भागातून होत आहे.



### कर्जफेड करणारेही प्रोत्साहनपर लाभाच्या प्रतीक्षेत

महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेंतर्गत नियमित कर्जफेड करणाऱ्या पात्र शेतकऱ्यांना जाहीर असलेल्या कमाल ५० हजार रुपयांच्या प्रोत्साहनपर लाभाचीही अनेक शेतकऱ्यांना अद्याप प्रतीक्षा आहे. कर्ज वेळेवर भरूनही लाभ मिळत नसल्याने नियमित कर्जदार शेतकऱ्यांमध्ये नाराजी आहे. नियमित कर्जफेड करणाऱ्या पात्र शेतकऱ्यांच्या खात्यावर प्रोत्साहनपर रक्कम तातडीने जमा करावी, अशी मागणीही ग्रामीण भागातून होत आहे.

# दिवाळीत ४९ हजार शिक्षकांना प्रशिक्षण

## १३ ते २२ नोव्हेंबरदरम्यान जिल्ह्यात आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२ अमरावती**

राज्यातील शिक्षकांना वरिष्ठ व निवड वेतनश्रेणीसाठी आवश्यक प्रशिक्षण देण्याच्या प्रक्रियेला सुरवात झाली असून, राज्यातील सुमारे ४९ हजार शिक्षकांना या प्रशिक्षणाचा लाभ मिळणार आहे. यासाठी २८ ते ३० सप्टेंबरदरम्यान राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे येथे राज्यस्तरीय प्रशिक्षण सुरू आहे. राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेचे संचालक मंगेश जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली सेवापूर्व विभागाच्या उपसंचालक अरुणा यादव, विभागप्रमुख डॉ. अरुण सांगालकर, डॉ. बाळकृष्ण वाटेकर यांच्यासह १० तज्ज्ञ मार्गदर्शकांकडून राज्यस्तरीय प्रशिक्षण दिले जात आहे. त्यानंतर जिल्हास्तरीय प्रशिक्षकांचे प्रशिक्षण १३ ते १७ ऑक्टोबरदरम्यान होणार असून, १३ ते २२ नोव्हेंबरदरम्यान शिक्षकांचे जिल्हा व तालुकास्तरावर प्रशिक्षण होणार आहे. दहा दिवसीय प्रशिक्षणात वरिष्ठ व निवड वेतनश्रेणी या दोन्ही प्रशिक्षणांमध्ये शिक्षकांच्या व्यावसायिक विकासासह विविध शैक्षणिक व प्रशासकीय बाबींवरील एकूण ४० विषयांवर मार्गदर्शन करण्यात येणार आहे.अमरावती जिल्ह्यातून डॉ. प्रवीण राठोड, अनिल पंजाबी, श्रीनाथ वानखडे, अतुल पडोळे, संदेश गिरी, मंगेश व्यवहारे, धीरज शर्मा आदी प्रशिक्षणार्थी राज्यस्तरीय प्रशिक्षणात सहभागी झाले आहेत.

उपक्रमाबाबत शिक्षकांमध्ये उत्सुकता शिक्षकांच्या सेवाशर्तीशी निगडित वरिष्ठ व निवड वेतनश्रेणी प्रक्रियेसाठी आवश्यक प्रशिक्षण टप्प्याटप्प्याने पूर्ण केले जाणार आहे. त्यामुळे शिक्षकांमध्ये या उपक्रमाबाबत उत्सुकता आहे.

# गाविलगड किल्ल्यावर स्वच्छता अभियान

## पुरातत्त्व विभाग व स्वराज्य सेवा प्रतिष्ठानचा संयुक्त उपक्रम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२चिखलदरा**

सांस्कृतिक मंत्रालय, भारत सरकार यांच्या ‘स्वच्छता ही सेवा २०२६’ या देशव्यापी उपक्रमांतर्गत भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षणाच्या नागपूर मंडळ आणि स्वराज्य सेवा प्रतिष्ठानतर्फे गाविलगड किल्ल्यावर स्वच्छता व प्लॅस्टिक निर्मूलन मोहीम राबविण्यात आली. मोहिमेदरम्यान किल्ल्यातील मच्छली दरवाजा ते वीरभान दरवाजा, या ऐतिहासिक परिसराची सखोल स्वच्छता करण्यात आली. तसेच पर्यटकांची मोठी वर्दळ असणाऱ्या वीरभान दरवाजा ते दिल्ली दरवाजा, या मार्गावर पडलेला प्लॅस्टिक कचरा मोठ्या प्रमाणावर संकलित करून किल्ल्याचा परिसर प्लॅस्टिकमुक्त करण्यात आला. ऐतिहासिक वास्तूंचे पावित्र्य आणि आजूबाजूचे नैसर्गिक पर्यावरण अबाधित राखण्याचा संदेश या मोहिमेच्या माध्यमातून देण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पृथ्वीराजसिंग राजपूत होते. प्रमुख पाहुण्या म्हणून पुरातत्त्व विभागाच्या कन्झर्वेशन आर्किटेक्ट रोशनी सूर्यवंशी उपस्थित होत्या. याप्रसंगी वनविभागाचे वनपाल पटेल, विस्तार अधिकारी विनोद तट्टे, आर्किटेक्ट नीलेश दौड, निखिल सदाशिव व राकेश महल्ले यांनी उपस्थित राहून मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदविला. या उपक्रमात बाळू देशमुख, अंकुश गायकवाड, सूरज इंगोले, अकोला येथील मयूर बोबडे, तेल्हार येथील मुकेश टापरे, देवा देशमुख यांच्यासह पुरातत्त्व विभागाचे कर्मचारी, स्वराज्य सेवा प्रतिष्ठानचे कार्यकर्ते आणि इतिहासप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.



> ऐतिहासिक वारशाचे जतन ही केवळ प्रशासनाची जबाबदारी नसून समाजाचेही सामूहिक कर्तव्य आहे. गडकिल्ल्यांचे पावित्र्य राखण्यासाठी आणि नैसर्गिक पर्यावरणाचा समतोल टिकवण्यासाठी नागरिकांनी प्लॅस्टिकचा वापर टाळावा.
> **शिवा काळे,** अध्यक्ष, स्वराज्य सेवा प्रतिष्ठान.

# शिरखेड-पिंपळखुटा केंद्राची संयुक्त शिक्षण परिषद

**विदर्भ प्रजासत्ताक**
**शिरखेड –** येरला येथील जिल्हा परिषद शाळेत शिरखेड व पिंपळखुटा केंद्राची संयुक्त शिक्षण परिषद उत्साहात झाली. शैक्षणिक कामकाज, ऑनलाइन उपक्रम, विद्यार्थ्यांची गुणवत्तावाढ यावर मार्गदर्शन झाले. नव्याने रुजू शिक्षकांचे स्वागत करण्यात आले. २९ सप्टेंबर रोजी झालेल्या परिषदेला दोन्ही केंद्रांतील शिक्षकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. केंद्र समन्वयक अभिषेक खांडे यांनी प्रास्ताविकातून शिक्षण परिषदेची रूपरेषा स्पष्ट करत केंद्रातील शैक्षणिक कामकाज व आगामी काळातील महत्त्वाच्या कामांचा आढावा घेतला. दिगंबर हिंगणे यांनी यू-डायस तसेच इतर ऑनलाइन कामांबाबत आवश्यक मार्गदर्शन केले. योगेश्वर काठोळे यांनी ‘निपुण भारत अभियान’ या विषयावर मार्गदर्शन केले. प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या मूलभूत भाषा व गणितीय क्षमता विकसित करण्यासाठी अभियानाचे महत्त्व त्यांनी स्पष्ट केले. गणेश जोशी यांनी ‘शैक्षणिक ग्रामसभा’ याविषयावर मार्गदर्शन करीत शाळा, पालक, ग्रामस्थ व शाळा व्यवस्थापन समितीच्या सहभागाचे महत्त्व सांगितले. प्रमुख अतिथी गटशिक्षणाधिकारी डॉ. नितीन उंडे व विषय साधन व्यक्ती कुशकुमार पाथरे यांनी शिक्षकांना मार्गदर्शन केले. केंद्रात नव्याने रुजू झालेल्या शिक्षकांचे मान्यवरांच्या हस्ते स्वागत करण्यात आले. संचालन संजय धांडे यांनी केले. आभार सुनील कविटकर यांनी मानले.



# दुपारी 3 ते ५ अधिकारी जनतेच्या भेटीला

## हेलपाटे थांबणार का?महसूल विभागाचा निर्णय;

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती** सरकारी कार्यालयांत अधिकारी भेटत नसल्याने तसेच नागरिकांच्या तक्रारींची दखल घेतली जात नसल्याच्या तक्रारींची महसूल विभागाने दखल घेतली आहे. शासनाच्या ९ सप्टेंबरच्या निर्णयानुसार जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, नायब तहसीलदारांसह महसूल विभागातील अधिकाऱ्यांसाठी दररोज दुपारी ३ ते ५ ही वेळ नागरिकांच्या भेटी व तक्रार निवारणासाठी राखीव करण्यात आली आहे.या दोन तासांच्या कालावधीत कोणतीही अंतर्गत बैठक किंवा व्हिडिओ कॉन्फरन्सिंग आयोजित करता येणार नाही. त्यामुळे तक्रारी, गाऱ्हाणी अथवा विविध कामांसाठी कार्यालयात येणाऱ्या नागरिकांना संबंधित अधिकाऱ्यांची भेट घेऊन आपली समस्या थेट मांडता येणार आहे. नागरिकांचा वेळ, पैसा आणि अनावश्यक हेलपाटे वाचविण्याच्या दृष्टीने हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे.या निश्चित वेळेची माहिती देणारा फलक कार्यालयाच्या प्रवेशद्वारावर तसेच संबंधित अधिकाऱ्यांच्या दालना बाहेर ठळकपणे लावणे अनिवार्य करण्यात आले आहे. तसेच कार्यालयात येणाऱ्या अभ्यागतांसाठी मध्यवर्ती नोंदवही ठेवण्याचेही निर्देश देण्यात आले आहेत. महसूल विभागाशी संबंधित सर्व तालुका कार्यालयांना याबाबत सूचना देण्यात आल्या असून, येत्या काही दिवसांत फलक लावण्याची कार्यवाही केली जाणार आहे. दरम्यान, महसूल विभागाप्रमाणेच जिल्हा परिषद आणि नागरिकांच्या दैनंदिन कामकाजाशी संबंधित अन्य सरकारी व निमसरकारी कार्यालयांमध्येही अशीच निश्चित भेटीची वेळ लागू करावी, अशी मागणी होत आहे. या निर्णयाची काटेकोर अंमलबजावणी झाल्यास नागरिकांचे हेलपाटे कितपत कमी होतात, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.शासनाची प्रतिमा मलीन करणारी बातमी खोटी, तथ्यहीनगैरसमज न पसरवण्याचे जिल्हा प्रशासनाचे आवाहनविदर्भ प्रजासत्ताक दि.२६अमरावती ८



साप्ताहिक वृत्त ’शब्दसूर्य’चे गंगाराम कुंजीलाल जांबेकर यांनी धारणी येथील तहसीलदार यांचे जुने शासकीय निवासस्थान आरएसएसच्या एनजीओला भाड्याने दिल्याबाबतचे वृत्त विविध प्रसारमाध्यमांमध्ये व व्हॉट्सप स्टेटसवर प्रसारीत केले असल्याचे आढळून आले आहे.

### शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन केली पाहणी व चर्चाआत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या कुटुंबीयांना भेट देऊन केले सांत्वन

# नैसर्गिक संकटात शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे

## – विधान परिषद उपसभापती सचिन अहिर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

नांदगाव खंडेश्वर परिसरातील गावांमध्ये अतिवृष्टी आणि दुष्काळ अशा दुहेरी संकटात शेतकरी सापडले आहेत. शेतकऱ्यांनी हताश होऊ नये. अशा संकट प्रसंगी शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे आहे.अमरावती जिल्ह्यातील सर्वच तालुके दुष्काळग्रस्त म्हणून जाहीर केले आहे तातडीने पंचनामे करण्यात येऊन शेतकऱ्यांना मदत देण्यात येईल, अशी माहिती विधान परिषद उपसभापती सचिन अहिर यांनी आज येथे दिली. नांदगाव खंडेश्वर परिसरातील गावांमध्ये अतिवृष्टी व दुष्काळामुळे झालेल्या नुकसानीची पाहणी उपसभापती





श्री. अहिर यांनी केली.तसेच,सालोड येथील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना त्यांनी सांत्वन पर भेट दिली. त्यानंतर त्यांनी ही माहिती दिली. मौजा मुंड निशंकराव येथील दीपक बोलाईत आणि मंगरूळ चव्हाळा येथील जानबाजी पारसकर यांच्या शेतात जाऊन उपसभापती श्री. अहिर यांनी सोयाबीन पिकाची पाहणी केली. अतिवृष्टीमुळे शेतातील माती व पीक वाहून गेले. जमीन खरवडली. सोयाबीनला पुरेशा शेंगा धरल्या नाहीत. उत्पादन खर्चही निघेल अशी स्थिती नाही. अशा समस्या शेतकऱ्यांनी मांडल्या. या भागात अतिवृष्टीमुळे शेतीच्या नुकसानी सोबतच राहत्या घरांची पडझड झाली यासंदर्भात उपसभापती श्री अहिर यांनी माहिती जाणून घेतली. प्रशासनाकडून करण्यात येणाऱ्या उपाययोजनांची माहिती त्यांनी जाणून घेतली. शेतकरी व नागरिकांना वेळेत मदत देण्यासाठी कार्यवाही करण्याच्या सूचना त्यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना दिल्या. यानंतर सालोड येथील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना त्यांनी सांत्वन पर भेट दिली. मुरलीधर वेळूकर यांनी बॅकवॉटर पाण्यामुळे शेतीचे सततचे नुकसान होत असल्याने यावर्षी जुलै महिन्यात आत्महत्या केल्याची माहिती त्यांचे वडील बंधू प्रकाश वेळूकर यांनी दिली. या समस्येमुळे सालोड व परिसरातील शेतकऱ्यांचे नुकसान होत असल्याची बाब त्यांनी मांडली. हा संपूर्ण विषय समजून घेत श्री. अहिर यांनी जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांना हा विषय सोडविण्यासाठी पाटबंधारे विभागाचे अधिकारी आणि समस्याग्रस्त शेतकऱ्यांची बैठक घेण्याच्या सूचना केल्या. या विषयासंदर्भात धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी डिसेंबर महिन्यामध्ये नागपूर येथे हिवाळी अधिवेशन कालावधीत संबंधित अधिकाऱ्या ची बैठक घेण्यात येईल असेही त्यांनी सांगितले. मुरलीधर वेळूकर यांच्या पत्नी वेळूकर,मुलगी समीक्षा आणि मुलगा सार्थक यांची आस्थेने चौकशी करून श्री. अहिर यांनी त्यांचे सांत्वन केले व प्रशासन त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याचे त्यांना आश्वस्त केले. येथील मनोज फरकाडे या शेतकऱ्याने यावर्षी एप्रिल महिन्यात आत्महत्या केली, त्यांच्या कुटुंबीयांना उपसभापती श्री अहिर यांनी भेट दिली. पत्नी शुभांगी फरकाडे व रुद्रांश (४ वर्ष) आणि शिवराज (८ वर्ष) या मुलांना त्यांनी दिलासा दिला. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्या ना दिली जाणारी मदत या कुटुंबाला मिळाली आहे. यासोबतच लाडकी बहीण योजना, श्रावण बाळ योजना आदी योजनांचा लाभ या कुटुंबाला देण्यात यावा, अशा सूचना त्यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना केल्या.सालोड गावचे सरपंच जगदीश ढगे, उपविभागीय अधिकारी तेजश्री कोरे, गटविकास अधिकारी स्नेहल शेलार, तालुका कृषी अधिकारी विकास पाटील आणि गावकरी यावेळी उपस्थित होते.नुकसानीची पाहणी व आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना भेट दिल्यानंतर श्री. अहिर यांनी नांदगाव खंडेश्वर येथील श्री. क्षेत्र खंडेश्वर संस्थान येथे शेतकऱ्यांशी संवाद साधला व त्यांच्या समस्या समजून घेतल्या.

---

# रायगड च्या दिवेआगरची सहल जीवावर बेतली

## वायगावचा यश वानखडेही काळाच्या पडद्याआड

### आठ विद्यार्थ्यांमध्ये अमरावतीच्या वलगाव मधील विद्यार्थी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती :**

शैक्षणिक सहलीसाठी गेलेल्या विद्यार्थ्यांवर काळाने घाला घातल्याची हृदयद्रावक घटना गुरुवारी रायगड येथे घडली होती . आळंदी येथील विनर्स कॅडमीच्या वतीने आयोजित खासगी सहलीदरम्यान पाण्यात बुडून आठ विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला. या दुर्घटनेमुळे विद्यार्थी, पालक आणि परिसरात शोककळा पसरली आहे. या दुर्दैवी घटनेत अमरावती जिल्ह्यातील वायगाव येथील यश किरण वानखडे या विद्यार्थ्याचाही मृत्यू झाला.मिळालेल्या माहितीनुसार, विनर्स कॅडमीच्या माध्यमातून आयोजित करण्यात आलेल्या या सहलीत एकूण ४२ विद्यार्थी सहभागी झाले होते. सहलीदरम्यान पाण्यात बुडाल्याने आठ विद्यार्थ्यांचा दुर्दैवी अंत झाला. एकाच वेळी आठ विद्यार्थ्यांचा मृत्यू झाल्याने या घटनेने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.या दुर्घटनेत



जीव गमावलेला यश किरण वानखडे हा अमरावती जिल्ह्यातील वायगाव येथील रहिवासी होता. त्याचे वडील किरण वानखडे हे कामानिमित्त आळंदी परिसरातील एमआयडीसीमध्ये कार्यरत असल्याने यश तेथे शिक्षण घेत होता. शैक्षणिक सहलीत सहभागी झालेल्या यशवर काळाने झडप घातल्याने वानखडे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.वायगावसह अमरावती शहरातही या घटनेची माहिती समजताच शोककळा पसरली. एका सहलीसाठी घराबाहेर पडलेल्या विद्यार्थ्यांचा असा दुर्दैवी अंत झाल्याने पालकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.या दुर्घटनेतील आठही मृत विद्यार्थ्यांच्या निधनाने त्यांच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून, संपूर्ण परिसरातून हळहळ व्यक्त होत आहे.

---

# उपोषणाच्या इशाऱ्यानंतर अखेर ५३ कर्मचाऱ्यांच्या बदल्या!

### अमरावती मनपाच्या उद्यान व स्वच्छता विभागातील हालचालींना वेग; बदल्यांच्या निर्णयावर प्रश्नचिन्ह कायम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती :** महानगर पालिकेच्या उद्यान विभाग आणि स्वच्छता विभागात एकाच टेबलवर अनेक वर्षांपासून कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचा मुद्दा अखेर चर्चेत आला आहे. १ ऑक्टोबर रोजी महानगरपालिकेच्या वतीने तब्बल ५३ कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. विशेष म्हणजे, दीर्घकाळ एकाच ठिकाणी कार्यरत कर्मचाऱ्यांच्या बदल्यांसाठी विभागीय आयुक्त कार्यालयाकडे उपोषणाचा इशारा देण्यात आला होता.

बाबासाहेब आंबेडकर कामगार सेनेचे जिल्हाध्यक्ष रविकुमार बनसोड यांनी ५ ऑगस्ट २०२६ रोजी यासंदर्भात तक्रार दाखल केली होती. उद्यान विभाग आणि स्वच्छता विभागातील काही कर्मचारी दीर्घकाळ एकाच टेबलवर कार्यरत असून, त्यांची तात्काळ बदली करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली होती. मागणी मान्य न झाल्यास १५ ऑगस्टपासून विभागीय आयुक्त कार्यालयासमोर बेमुदत उपोषण व तीव्र आंदोलन करण्याचा इशाराही देण्यात आला होता.



या तक्रारीची दखल घेत विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगर परिषद प्रशासन कार्यालयाचे विभागीय सहआयुक्त नितीन कोकणवाडीस यांनी ११ ऑगस्ट २०२६ रोजी अमरावती महानगरपालिका आयुक्तांना पत्र पाठवून नियमानुसार आवश्यक कार्यवाही करून तक्रार निकाली काढण्याचे निर्देश दिले होते. तसेच तक्रारदारांना उपोषणापासून परावृत्त करण्याबाबतही कळविण्यात आले होते.त्यानंतर १ ऑक्टोबर रोजी ५३ कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती आहे. मात्र, या बदल्यांमध्ये उद्यान विभाग आणि स्वच्छता विभागातील संबंधित दीर्घकाळ एकाच टेबलवर कार्यरत कर्मचाऱ्यांचा प्रत्यक्ष समावेश किती? सर्व संबंधित कर्मचाऱ्यांच्या बदल्या झाल्या आहेत का? की केवळ काही कर्मचाऱ्यांपुरतीच ही कार्यवाही मर्यादित आहे? असे प्रश्न आता उपस्थित होत आहेत.५३ बदल्यांनंतरही मूळ तक्रारीचे पूर्ण निराकरण झाले का, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे. प्रशासनाने बदली आदेशांची पारदर्शक माहिती सार्वजनिक केल्यास या निर्णयाबाबतचे चित्र स्पष्ट होऊ शकते.

---

# वडिलोपार्जित १६ एकर शेतीच्या हक्कासाठी शेतकरी टॉवरवर

### गांधी जयंतीदिनी मोझरी गुरुकुंज येथे प्रदीप डाखोरे यांचे आंदोलन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती–** गांधी जयंतीच्या दिवशी मोझरी गुरुकुंज येथे शेतकरी प्रदीप डाखोरे यांनी टॉवरवर चढून आंदोलन केल्याने खळबळ उडाली. वडिलोपार्जित कुळनिहाय १६ एकर शेतीच्या हक्कासाठी त्यांनी हे आंदोलन केले.

डाखोरे यांच्या म्हणण्यानुसार, संबंधित शेतीच्या हक्कासाठी गेल्या अनेक महिन्यांपासून ते प्रशासनाकडे मागणी करीत आहेत. मात्र,



वारंवार पाठपुरावा करूनही त्यांच्या मागणीवर अद्याप ठोस तोडगा निघालेला नाही. त्यामुळे शासन–प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी त्यांनी टॉवरवर चढून आंदोलनाचा मार्ग स्वीकारला.गांधी जयंतीच्या दिवशीच झालेल्या या आंदोलनामुळे प्रशासनाची धावपळ उडाली. डाखोरे यांच्या मागणीची दखल घेऊन प्रशासनाने तातडीने योग्य तो निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. टॉवरवर चढलेल्या शेतकऱ्याला खाली उतरविण्यासाठी संबंधित यंत्रणेकडून प्रयत्न सुरू करण्यात आले.

---

# अपघातात जखमी मजुराचा दहा दिवसांनी मृत्यू

**.विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२तिवसा** तळेगाव ठाकूर येथील गजानन अंबादास ठाकरे (वय ४८ वर्षे) यांचा अपघाता नंतर दहा दिवसांनी उपचारादरम्यान शुक्रवारी, दि. २ ऑक्टोबर २०२६ रोजी मृत्यू झाला. दि. २३ सप्टेंबर रोजी सकाळी साडेसहा वाजताच्या सुमारास चिस्तूर ते भीष्णूर मार्गादरम्यान हा अपघात झाला होता.प्राप्त माहितीनुसार, तळेगाव ठाकूर येथील चार जण दोन दुचाकींवरून चिस्तूर परिसरातील शेतात मजुरीच्या कामासाठी जात होते. दरम्यान, चिस्तूरजवळ बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांसह पोलिसांनी जनावरांची वाहतूक करणारा पिकअप वाहन पकडल्याचे दिसल्याने गजानन ठाकरे यांचे लक्ष त्या दिशेने गेले. त्याचवेळी दुचाकीवरील त्यांचे नियंत्रण सुटल्याने एमएच २७ डीके ३२३५ क्र.त्यांची दुचाकी समोरच्या दुचाकी वर धडकली.या अपघातात गजानन ठाकरे गंभीर जखमी झाले, तर त्यांच्यासोबत असलेले सहकारी सौरभ गळकाटे यांनाही किरकोळ दुखापत झाली. अपघातानंतर घटनास्थळी उपस्थित नागरिक व



पोलिसांनी जखमींना तातडीने तिवसा शासकीय रुग्णालयात दाखल केले. गजानन ठाकरे यांच्या डोक्याला गंभीर दुखापत होऊन मोठ्या प्रमाणात रक्तस्राव होत असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी अमरावती येथील इर्विन रुग्णालयात रेफर करण्यात आले.त्यानंतर त्यांच्या प्रकृतीची गंभीरता लक्षात घेता त्यांना अमरावती येथील सुपर स्पेशालिटी रुग्णालयात हलविण्यात आले. तेथे त्यांच्या डोक्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली. मात्र, गेल्या दहा दिवसांपासून मृत्यूशी झुंज देत असलेल्या गजानन ठाकरे यांची अखेर शुक्रवारी प्राणज्योत मालवली.गजानन ठाकरे हे मजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करत होते. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा आणि एक मुलगी असा परिवार आहे.

---

# विरोधक २०२९च्या निवडणुकीसाठी मुद्दा शोधत आहेत ; निवडणूक आयोगाला लक्ष्य केले जात आहे

## – किरीट सोमय्या

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

मुंबईतील शिवाजी पार्क येथे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी सुरू असलेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर भाजप नेते तथा माजी खासदार किरीट सोमय्या यांनी विरोधकांवर निशाणा साधला. विरोधक २०२९च्या लोकसभा निवडणुकीला डोळ्यासमोर ठेवून निवडणूक आयोग आणि संवैधानिक संस्थांना लक्ष्य करत आहेत, असा आरोप त्यांनी केला.सोमय्या आज अमरावती दौऱ्यावर होते यावेळी त्यांनी प्रसार माध्यमांसोबत संवाद साधला.

सोमय्या म्हणाले की, विरोधी पक्षांना २०२९च्या निवडणुकीची चिंता लागली असून त्यासाठी एखादा राजकीय मुद्दा निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू



आहे. २०२४च्या लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात भाजपचा पराभव झाला, त्यावेळी याच मतदार याद्या विरोधकांना योग्य वाटत होत्या. केरळमध्ये काँग्रेस विजयी झाल्यानंतरही मतदार यादीच्या प्रक्रियेबाबत वेगळी भूमिका घेतली जात असल्याचा दावा त्यांनी केला.दरम्यान, सीजेपीकडून आज २ ऑक्टोबर रोजी मुंबईतील शिवाजी पार्क येथे ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी आंदोलनाची घोषणा करण्यात आली होती. पोलिसांनी परवानगी नाकारल्यानंतरही आंदोलनाची घोषणा करण्यात आली असून परिसरात सुरक्षा व्यवस्था वाढवण्यात आली आहे.निवडणूक आयोग, सर्वोच्च न्यायालय, राष्ट्रपती आणि राज्यपाल यांसारख्या संवैधानिक संस्थांची प्रतिमा मलीन करण्याचा प्रयत्न विरोधकांकडून होत असल्याचा आरोपही सोमय्यांनी केला. महाराष्ट्रातील महायुती सरकार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली काम करत असून केंद्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली विकासाची कामे सुरू राहतील, असेही त्यांनी सांगितले.एसआयआरच्या माध्यमातून मतदार यादी शुद्धीकरणाचे काम सुरू असल्याचे सांगताना सोमय्यांनी मतदार यादीत बांगलादेशी नागरिकांची नावे असल्याचा दावा केला. मात्र, हा दावा सोमय्यांचा आरोप म्हणूनच मांडला जात आहे.

---

# समृद्धी महामार्गावर साडेतीन वर्षांत ५७२ जणांचा मृत्यू!

## आणखी किती जणांचे बळी जाणार?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती–** नागपूर–मुंबई समृद्धी महामार्ग हा मृत्यूचा सापळाच बनत चालला आहे. शुक्रवारी पहाटे शेगाव येथून दुर्गादेवीची मूर्ती घेऊन वर्धेकडे जाणाऱ्या वाहनाला धामणगाव नजीक ट्रकने मागून धडक दिल्याने झालेल्या भीषण अपघातात सात जणांना प्राण गमवावे लागले. या अपघाताने पुन्हा एकदा समृद्धी महामार्गावरील वाढत्या अपघातांचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. गेल्या साडेतीन वर्षांत या महामार्गावर ६३३ अपघातांमध्ये ५७२ जणांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक आकडेवारी समोर आली आहे.

**आठ महिन्यांत १२८ जणांचे बळी–** समृद्धी महामार्गावर डिसेंबर २०२२ ते ३१ जानेवारी २०२६ या कालावधीत एकूण ४९१ अपघात घडले होते. त्यात ४४४ जणांचा मृत्यू झाला होता. तर जानेवारी ते ऑगस्ट २०२६ या आठ महिन्यांमध्ये समृद्धी महामार्गावर १४२ अपघातांमध्ये १२८ जणांना प्राण गमवावे लागले. माहिती अधिकारातून ही आकडेवारी समोर आली आहे. गेल्या जूनमध्ये धामणगाव रेल्वेजवळील चॅनेल क्रमांक १०५ च्या परिसरात रस्त्यावर उभ्या असलेल्या कंटेनरला भरधाव कार धडकून एकाच कुटुंबातील पाच जणांचा मृत्यू झाला. शुक्रवारी पहाटे घडलेला अपघात हा चॅनेल क्रमांक ९७ येथे घडला.



**प्रवासाचा वेळ वाचतो पण**

समृद्धी महामार्गामुळे नागपूर ते मुंबई प्रवासाला लागणारा वेळ कमालीचा कमी झाला आहे. मात्र, वाढते अपघात हा चिंतेचा विषय बनला आहे. यावर अभ्यासही करण्यात आले आहेत.

### कोणत्या कारणांमुळे अपघात होताहेत?

'महामार्ग संमोहन' हे ३३ टक्के अपघातांसाठी कारणीभूत असल्याचे अभ्यासातून सांगण्यात आले आहे. 'लेन कटिंग' हे देखील एक मुख्य कारण आहे. आपली लेन सोडून दुसऱ्या लेनवर जाताना योग्य ती काळजी घेत नियमांचे पालन करायला हवे. तसे न केल्यास लेने बदलणारी व्यक्ती दुसऱ्या लेनवर जाते, तेव्हा त्या लेनवरील मागून येणाऱ्या वाहनांच्या चालकांना त्याचा अंदाज येत नाही. या कारणामुळे अपघात होतात. ५१ टक्के ट्रकचालक लेन ओलांडण्याचे नियम पाळत नाहीत, असे निरीक्षण नोंदविण्यात आले आहे.

त्यातून 'महामार्ग संमोहन' हेही एक कारण असल्याचे सांगण्यात आले. कोणत्याही अडथळ्या विना महामार्गावर वाहन सरळ एकाच दिशेने धावत असते, तेव्हा चालकाच्या शरिराची हालचाल स्थिर होते, चालकाचा मेंदू प्रतिक्रियेसाठी सक्रिय नसतो. त्याला 'महामार्ग संमोहन' असे म्हणतात. विशेष म्हणजे या महामार्गावर बहुतांश अपघात हे रात्रीच्या वेळी घडले आहेत.


अमरावती येथून प्रकाशित
सांध्य मराठी दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
विश्वसनीयता... हेच आमचं बळ !
राजकीय, कृषी, सामाजिक, शैक्षणिक, कृषी, काईम बातम्यांचे सविस्तर विश्लेषण.
राजकीय
कृषी
सामाजिक
शैक्षणिक
कृषी
क्राईम
अमरावती
विदर्भ प्रजासत्ताक
विकासाच्या नव्या पर्वाकडे विदर्भ
शेतकरी समस्या आणि उपाय
राजकारण
कृषी
शिक्षण
समाज
आमच्या चॅनल ला आजच जॉईन व्हा!
NEWS UPDATE
HTTPS: epaper.vidarbhaprajasattak.com
या साईड ला अवश्य भेट द्या...
बातमी व जाहिरात साठी या व्हाट्सए
8605948853
नंबर वर संपर्क करा
विदर्भ प्रजासत्ताक
विदर्भाच्या विकासासाठी नवीन दिशा
राजकारण
कृषी
शिक्षण
क्राईम
आपल्या विश्वासासाठी... नेहमीच तत्पर !